वृत्तपत्राचे नांव :— सकाळ
वृत्तपत्र प्रकाशनाचे ठिकाण :— नाशिक
वृत्तपत्र पान क :— पुरवणी नं 4
दिनांक :—17/3/2010

### वेद अध्ययन

# वेदपाठशाळाही धरताहेत संगणकीकरणाची कास

**प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत 'वेद अध्ययन' या एकमेव कर्मकर्तव्याचा वसा जपत नाशिक शहरातील वेदपाठशाळांमध्ये वेद अध्ययन सुरू आहे. पाठशाळेचा ऋणानुबंध जपण्यात तरुणाईही मागे नाही. पाठशाळेत वेद अध्ययनाबरोबरच इंग्रजी, इंटरनेट, मोबाईल तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळविण्यासाठी तरुण पुढे सरसावत आहेत...**

**धनंजय संत**

वेदपाठशाळा या संस्कृती संवर्धन, संस्कृत भाषेचे पुनरुज्जीवन आणि विद्यादानाचे कार्य करत आहेत. या पाठशाळा म्हणजे प्राचीन वैदिक संस्कृती जपणाऱ्या आधारवड आहेत. पाठशाळांमधून संस्कार, शिस्त यातून कित्येक विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा मिळाली आहे. सध्या नाशिकच्या या पाठशाळांमध्ये महाराष्ट्रासह भारताच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी शिकण्यासाठी येत आहेत. आता इंग्रजी, गणित, वेदातील विज्ञान, संगणकाचे प्रशिक्षण काही पाठशाळांमध्ये देण्यास सुरवात झाली आहे.

प्राचीन काळात गुरुकुल पद्धतीला अनन्यसाधारण महत्त्व होते, ही प्राचीन संस्कृती टिकवून ठेवण्याचे महत् कार्य वेदपाठशाळा करत आहेत. गुरुजींच्या उपदेशाप्रमाणे स्वाध्याय म्हणजे अध्ययन आणि प्रवचन म्हणजे अध्यापन हेच ध्येय ठरवून वेदपाठशाळा सुरू आहेत.

नाशिकमध्ये गुरू गंगेश्वर वेदपाठशाळा (महिरावणी), अखंडानंद वेद संस्कृत विद्यालय (कैलास मठ, पंचवटी), वैदिक ज्ञान-विज्ञान संस्कृत महाविद्यालय (केवडीबन), तसेच महर्षी गौतम वेदविद्या प्रतिष्ठान (गोवर्धन- गंगापूर) या चार निवासी पाठशाळा कार्यरत आहेत. दक्षिणेची काशी असलेल्या नाशिकमध्ये चतुर्वेद प्रवर्तक महर्षी याज्ञवल्क्य वेद विद्यालय (नारोशंकर मंदिरासमोर, गंगाघाट), कल्पतरू वेदपाठशाळा (सोमवार पेठ), नाशिक वेदशास्त्र पाठशाळा (भद्रकाली) या अनिवासी पाठशाळांमध्ये वेद अध्ययन केले जात आहे. याशिवाय, गिरीश पैठणे, रत्नाकर गायधनी, अविनाश देव, राजाभाऊ खोचे, नारायणशास्त्री भानोसे, चिंतामणशास्त्री आंबेकर, भालचंद्रशास्त्री शौचे, वसंत शुक्ल, नितीन मोडक, रामचंद्र (बाळासाहेब) शिंगणे हे घरगुती पाठशाळा चालवत आहेत. नवनवीन उपक्रम राबविण्यावर शहरातील सर्वच पाठशाळांचा भर दिसत आहे. गुरुमुखातून विद्या घ्यायची पारंपरिक पद्धतीबरोबरच आधुनिक शिक्षणाचा वसा या पाठशाळा जोपासताना दिसत आहेत. कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयामार्फत (रामटेक, नागपूर) घेण्यात येणारे बी. ए., एम. ए. समकक्ष अभ्यासक्रमांची नाशिक केंद्रातर्फे परीक्षा घेण्यांत येत आहे. कर्मकांड, वेदांच्या शिक्षणासह इंग्रजी, संगणक वर्ग आठवड्यातून घेण्याची सुविधा काहीं पाठशाळांनी केली आहे.



अमेय काथे, अखिलेश कापसे, मंगेश वडजेकर, विजय जोशी, अमोल जोशी, योगेश जोशी, तेजस भोगायका, हेमंत पाठक, गणेश भाले, अनंत कोरडे, संजय पांडव, भूषण पाठक, आकाश शर्मा, अक्षय जोशी, शेखर शुक्ल, मंदार देव, मंदार शिंगणे, विक्रम आंबेकर, पाडळीकर, राहुल बेळे, धनंजय जोशी आदी नवी पिढी वेद अध्ययनात रुची घेऊन प्रगतिपथावर आहे. वैदिक ज्ञान- विज्ञान संस्कृत पाठशाळेत वेद अध्ययन केलेले सागर शुक्ल हे विद्यार्थी लंडनमध्ये पौरोहित्य करत आहेत. तर, डिकुल दवे या विद्यार्थ्यांकडे ऑस्ट्रेलियातील मंदिराची जबाबदारी आहे. केयूर पुरोहित बडोदा महाराज संस्कृत महाविद्यालयात संस्कृत वर्ग शिकवत आहे. नवोदित पिढीला दिनेशशास्त्री गायधनी, मुकुंद आंबेकर, अविनाश देव, यशवंत पैठणे, शांतारामशास्त्री भानोसे आदी मार्गदर्शन करीत आहेत.